## जिल्हा कोकणात अव्वल; कृषी विभागामार्फत कृषीदिनी शेतकऱ्यांचा गौरव

# हरभरा उत्पादनात पालघरची भरारी

**लोकसत्ता वार्ताहर**

**पालघर:** गेल्या रब्बी हंगामावर आधारित हरभरा या पिकावर घेण्यात आलेल्या पीक स्पर्धेमध्ये कोकण विभागात पालघरच्या दोन शेतकऱ्यांचा पहिला क्रमांक आला असून द्वितीय व तृतीय क्रमांकासाठी प्रत्येकी दोन शेतकऱ्यांची निवड झाली आहे. शेतकऱ्यांना हरभरा पिकाच्या भरघोस उत्पादनाबद्दल कृषी विभागामार्फत कृषीदिनी सन्मानित करण्यात आले.

कोकण विभागीय पीक स्पर्धेप्रमाणेच तीळ व हरभरा या पिकांसाठी घेतलेल्या जिल्हास्तरीय पीक स्पर्धेमध्ये पालघर तालुक्याला सर्वाधिक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. पालघर तालुक्यातील सहा शेतकऱ्यांनी या स्पर्धेत बाजी मारली असून पिकांच्या भरघोस उत्पादनात पालघर तालुका अग्रेसर असल्याचे या सर्व शेतकऱ्यांनी दाखवून दिले आहे. कोकण विभागीय स्पर्धेमध्ये प्रथम आलेल्या दोघा शेतकऱ्यांनी कमी क्षेत्रामध्ये सुमारे २३ क्विंटल हरभरा उत्पादन करून कोकण विभागात अव्वल स्थान पटकावले. तर जिल्हास्तरीय स्पर्धेत सर्वाधिक २२.८१ क्विंटल तीळ उत्पादन घेऊन पालघर तालुका अग्रेसर राहिला आहे.

विभागस्तरीय तसेच जिल्हास्तरीय पीक स्पर्धेमध्ये गुण अनुक्रमांक प्राप्त केलेल्या शेतकऱ्यांचा सन्मान सोहळा पालघर पंचायत समिती सभागृहामध्ये शेतकऱ्यांच्या उपस्थितीत जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा भारती कामडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सिद्धाराम सालिमठ, जिल्हा कृषी अधीक्षक काशिनाथ तरकसे व इतर मान्यवरांच्या हस्ते वितरित करण्यात आले. शेतकऱ्यांनी कृषी विभागाच्या सहकार्याने उत्पादन वाढीसाठी व उत्पन्न वाढीसाठी प्रयत्न करावेत, असे प्रतिपादन यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सिद्धाराम सालिमठ यांनी शेतकऱ्यांसमोर केले.

### कोकण विभाग हरभरा पीक स्पर्धा विजेते

**प्रथम क्रमांक**

पांडुरंग सखाराम झोले, रायतळे, जव्हार ( उत्पादन २३.५० क्विंटल)

पद्माकर मुकुंद तरे, खानिवडे, वसई ( उत्पादन २३ क्विंटल)

**द्वितीय क्रमांक**

शरद मुकुंद चौधरी खेर, पाडा वसई ( उत्पादन २२.८५ क्विंटल)

धनराज गणेश माळवी, भाताने, वसई ( उत्पादन २१.७२ क्विंटल)

**तृतीय क्रमांक**

गणेश राजाराम दुमडा, तिल्हेर, वसई ( उत्पादन २१.७९ क्विंटल)

अनिल पद्माकर पाटील, वडदे, डहाणू ( उत्पादन १५ क्विंटल)

### जिल्हास्तरीय हरभरा व तीळ स्पर्धेचे विजेते

**प्रथम क्रमांक**

संतोष आप्पा पागी, कोकणेर, पालघर तालुका (काळे तीळ उत्पादन २२.८१ क्विंटल)

गणेश रामचंद्र पाटील, गिरनोली, पालघर तालुका (हरभरा उत्पादन १९.४३ क्विंटल)

**द्वितीय क्रमांक**

बाळकृष्ण खंडू पाटील, गिरनोली, पालघर तालुका (हरभरा उत्पादन १५.७१ क्विंटल)

रघुनाथ मंगळ्या गायकवाड, सागावे, पालघर तालुका (काळे तीळ उत्पादन १२.१०० क्विंटल)

**तृतीय क्रमांक**

मदन कुशा पाटील, गिरनोली, पालघर तालुका (हरभरा उत्पादन १५.४६ क्विंटल)

बळीराम शंकर जाधव, वसरोली पालघर तालुका (काळे तीळ उत्पादन ५.८२ क्विंटल)